# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२-२९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ५४-२२** **दिनांक १६/०२/२०२२**

## जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतास गजाआड करण्यास पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १३/०२/२०२२ रोजी २०.३० वा. चे सुमारास दुर्गा मंदिराचे जवळ, गिदराईपाडा, तुंगारेश्वर रोड, तुंगारफाटा, वसई (पु.), ता. वसई जि. पालघर येथे फिर्यादी हे टेम्पो क्रं.एम.एच. ४८/ए.जी.००८१ हा तुंगारेश्वर रोडने चालवुन घेवुन जात असतांना चार अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचा टेम्पो अडवून त्यांना मारहाण करुन त्यांचे टेम्पोत ठेवलेले १८,०००/- रुपये रोख रक्कम जबरीने काढुन घेवुन पळुन गेले बाबत फिर्यादी- श्री.शिवम विनोद शर्मा, व्यवसाय- चालक, रा. सातीवली नाका, वसई (पु.), ता. वसई, जि. पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतांविरुध्द पेल्हार पो. स्टे. गु.रजि.नं. I १३८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम-३९४, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे दिनांक १४/०२/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन घटना ठिकाणचे सी.सी.टी.व्ही. फुटेजचे सुक्ष्म परिक्षण केले असता सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये दिनांक १३/०२/२०२२ रोजी सायंकाळी ७.१५ वाजता एक काळया/निळया रंगाची पल्सर २२० मोटर सायकलवरुन दोन इसम जातांना दिसत असुन सदर इसमांपैकी मागे बसलेला इसम हा रेकॉर्ड वरील आरोपीत दर्पण म्हात्रे हा असल्याचे ओळखल्याने लागलीच दर्पण म्हात्रे याचा शोध घेतला असता यातील आरोपीत नामे. १) दर्पण वैभव म्हात्रे, रा. मु. तांबडमाळ, पो. कामण, ता. वसई, जि. पालघर, २) महेश लक्ष्मण बेडगा, रा.मु. बेलकडी, पो. कामण, ता. वसई, जि. पालघर, ३) मितेश रघुनाथ कामडी, रा. मु. बेलकडी, पो. कामण, ता. वसई, जि. पालघर हे मिळुन आल्याने त्यांना दि.१४/०२/२०२२ रोजी नमुद गुन्हयात २४ तासाचे आत अटक केली आहे. नमुद आरोपीत यांचेकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल व चोरीस गेलेली रक्कम असा एकुण- ५५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि/सुनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, पोना/तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.